CMYK

दहशतवाद कारवाई नंतर शिष्टाई करण्यासाठी विदेशात गेलेले शिवसेनेचे गटनेते खा. डॉ.श्रीकांत शिंदे यांचा केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला सत्कार >>पान 2

राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष अनुजाताई सावळे, सरचिटणीस सरलाताई बाहेकर आणि उबाटा महिला आघाडी प्रमुख जिजाबाई राठोड यांचा शिवसेनेत प्रवेश >>पान 3

बकरी ईद सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा करा - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील >>पान 4


**सुविचार**
आपल्या कुटुंबासाठी वेळ काढा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 265 ■ शुक्रवार, दि. 06 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




# समृद्धी महामार्ग रेकॉर्डब्रेक वेळेत पूर्ण

## आता शक्तीपीठ महामार्गही करु : देवेंद्र फडणवीसांचा निर्धार!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : नागपूर ते मुंबई विनाअडथळा प्रवास करणं आता शक्य होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते समृद्धी महामार्गाच्या चौथ्या टप्प्याचं लोकार्पण झालं. समृद्धी महामार्गाच्या बहुप्रतीक्षित इगतपुरी ते आमणे या शेवटच्या टप्प्याचं लोकार्पण झाल्यानं नागपूर येथून निघालेल्या वाहनांना थेट मुंबईच्या वेशीवर आठ तासांत पोहोचता येणार आहे. यानंतर आता शक्तिपीठ महामार्ग पूर्ण करण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.**

समृद्धी महामार्ग रेकॉर्डब्रेक वेळेत पूर्ण झाला. आता शक्तिपीठ महामार्ग पूर्ण करणार असून त्यामुळे मराठवाड्याचे आर्थिक चित्र बदलेल असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यातील १२ जिल्ह्यातून जाणारा हा महाम ार्ग तीन शक्तिपीठांसह अनेक मोठ्या धार्मिक ठिकाणांना जोडणारा असेल.

कसा असेल शक्तिपीठ महामार्ग?

विदर्भातील वर्धा ते कोकणातील बांधापर्यंत एकूण ८०५ किलोमीटरचा शक्तिपीठ महामार्ग असणार आहे. राज्यातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांतून शक्तीपीठ महामार्ग जाणार आहे. हा महामार्ग सहा पदरी असेल. महामार्गावर २६ ठिकाणांवर इंटरचेंज असेल. ४८ मोठे पूल, ३०



बोगदे, आठ रेल्वे क्रॉसिंग असतील. शक्तिपीठ महामार्गासाठी तब्बल ८६ हजार कोटी रुपयांचा खर्च येणार आहे.

कोणत्या देवस्थानांना हा महामार्ग जोडणार?

कोल्हापूर – अंबाबाई, तुळजापूर – तुळजाभवानी. नांदेड – माहूरची रेणुका देवी या तीन शक्ती पीठांना जोडणारा हा महामार्ग असणार आहे. परळी वैजनाथ, हिंगोली जिल्ह्यातील औंधा नागनाथ (नागेश्वर), माहूरची रेणुकादेवी, तुळजापूरची तुळजाभवानी, पंढरपुरचे विठ्ठल रखुमाई मंदिर, कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर, सोलापुरातील सिद्धरामेश्वर, अक्कलकोट, गाणगापूर, कारंजा (लाड), नृसिंहवाडी, औदुंबर या बारा देवस्थानांना हा महामार्ग जोडणार आहे.

काय म्हणाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस?

२०१४ ला आम्ही जे स्वप्न बघितले त्याची पूर्तता आज होते आहे. हा केवळ रस्ता नाही तर महाराष्ट्राच्या इकॉनॉमिक कॉरिडॉर आहे. म हाराष्ट्राचे २४ जिल्हे जेएनपीटी सोबत कनेक्टेड आहेत. ते वाढवण सोबत आम्ही जोडणार आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी पहिल्या टप्प्याचे उद्घाटन केले होते. >>पान २

## फडणवीस सरकारचा मोठा निर्णय, ९०३ योजना रद्द करण्याची केली घोषणा

**मुंबई/प्रतिनिधी** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सरकारने तब्बल ९०३ विकास योजनांची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. म ागील ३ वर्षापासून रखडलेल्या आणि अंमलबजावणीत प्रगती न झालेल्या योजनांचा यात समावेश आहे.

कोणत्या योजनांचा समावेश?

मृद व जलसंधारण विभागामार्फत जाहीर करण्यात आलेल्या या निर्णयात लघुपाटबंधारे योजना, कोअर पाझर बंधारे, पाझर तलाव आणि साठवण तलाव दुरुस्ती योजना अशा विविध प्रकल्पांचा समावेश आहे. अनेक योजना गेल्या तीन वर्षापासून फाईलांपुरती मर्यादित राहिल्या होत्या.

भूसंपादनात अडचणी, स्थानिक नागरिकांचा तीव्र विरोध, आणि ठेकेदारांकडून मिळणारे असहकार्य यांसारख्या कारणांमुळे या योजना प्रत्यक्षात कार्यान्वित होऊ शकल्या नाहीत. यामुळे शासनाने यावर वेळ न घालवता, थेट प्रशासकीय मान्यता रद्द करण्याचा मार्ग स्वीकारला असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## पक्षविरोधी काम करणाऱ्यांच्या कार्यक्रमाला येऊ नका

### भाजपा कार्यकर्त्यांचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंना आवाहन

**अहिल्यानगर/प्रतिनिधी** : शेवगाव येथे भाजपाचे नेते अरुण मुंढे यांनी ४ व ५ जून रोजी कुस्ती स्पर्धेचं आयोजन केलं आहे. या कुस्ती स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाला भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे येणार आहेत. पण यावरून आता जिल्हा भाजपाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी चांगलेच नाराज झाले आहेत. वास्तविक, अरुण मुंढे यांनी विधानसभा निवडणुकीत भाजपाऐवजी विरोधी उमेदवाराचा प्रचार केला. अशा स्थितीत भाजपा प्रदेशाध्यक्षांनी मुंढे यांच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावू नये, असं आवाहन जिल्ह्यातील कार्यकर्ते तसेच, पदाधिकाऱ्यांनी केलं आहे.

बक्षीस वितरणाला भाजपाचे बडे नेते येणार : अरुण मुंढे यांनी त्यांच्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेला 'देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धा,' असं नाव दिलं आहे. या स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील येणार आहेत. यामुळे शेवगावम धील भाजपा कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांम ध्ये संभ्रमाचं वातावरण निर्माण झालं आहे. पक्षविरोधी काम करणाऱ्या अरुण मुंढे यांच्या कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष येत असल्यानं अनेकांनी नाराजी व्यक्त केली. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहू नये, असं आवाहन शेवगावमधील भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी केलं आहे. या निमित्ताने शेवगावमधील भाजपा अंतर्गत वाद पुन्हा एकदा उफाळणार असल्याचं चित्र दिसून येत आहे. वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाला न येण्याबाबतचं निवेदन



शेवगावचे माजी जिल्हा परिषद सदस्य व नगरसेवक अशोक आहुजा, माजी तालुकाध्यक्ष बाप्पूसाहेब पाटेकर, भाजपा शहराध्यक्ष बापूसाहेब धनवडे, सरचिटणीस भिमराज सागडे, नगरसेवक सागर फडके, नगरसेवक गणेश कोरडे व सर्व भाजपा शेवगांव तालुका व शहर पदाधिकारी यांनी दिलं आहे.


अरुण मुंढे–मोनिका राजळे वाद वाढणार? : विधानसभा निवडणुकीत पक्षातील वरिष्ठांनी मुंढे यांना राजळे यांच्यासोबतचा वाद मिटवून पक्षाचे काम करण्याचा आदेश दिला होता. पण असे असतानादेखील मुंढे यांनी वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत विरोधी भूमिका घेतली होती. शेवगाव पाथर्डी विधानसभा मतदारसंघाचे भाजपाचे अधिकृत उमेदवार मोनिका राजळे यांच्याविरोधात भूमिका घेत अरुण मुंढे यांनी काम केलं. दरम्यान, मुंढे तसेच त्यांच्या समर्थकांनी विरोधात काम करुनही मोनिका राजळे यांनी तिसऱ्यांदा विजयाची हॅट्रिक मारत विरोधकांना जोरदार उत्तर दिलं.

## देशहितासाठी काम करणं हे पक्षविरोधी वाटत असल्यास स्वत:लाच प्रश्न विचारण्याची गरज–शशी थरुर

**वॉशिंग्टन** : ज्यांना देशहितासाठी काम करणं हे पक्षविरोधी कृत्य असल्याचं वाटतं, त्यांनी स्वत:लाच प्रश्न विचारण्याची गरज आहे. पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर दहशतवादाविरुद्ध भारताची भूमिका मांडण्यासाठी काँग्रेसचे खासदार शशी थरूर हे अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. ते सर्वपक्षीय संसदीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करत आहेत.

काँग्रेसचे खासदार शशी थरुर हे सर्वपक्षीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करताना काँग्रेसच्या काही नेत्यांनी टीका केली होता. त्यावर शशी थरुर म्हणाले, '' जेव्हा कोणी देशाची सेवा करत असतो, तेव्हा त्यानं अशा गोष्टींबद्दल जास्त काळजी करण्याची गरज नाही, असे वाटते.''

भारतात परतल्यानंतर पक्षाच्या नेत्यांना काय संदेश द्याल असे



विचारले असता थरुर म्हणाले, ''म ला प्रामाणिकपणे वाटते, सध्या आपण येथे एका मोहिमेवर लक्ष केंद्रित केलं आहे. विविध व्यक्तींकडून काय बोललं जात नाही, याची काळजी करण्यात आपल्याला जास्त वेळ घालवण्याची गरज नाही. जेव्हा वेळ येईल तेव्हा आपण त्याचा) सामना करू.

संपूर्ण भारताचे प्रतिनिधी म्हणून आलो– शशी थरूर काँग्रेस सोडून भाजपामध्ये सामील होतील, अशी सोशल मीडियात चर्चा सुरू आहे. त्याबाबत विचारले असता खासदार थरुर म्हणाले, ''मी संसदेत निवडून आलेला खासदार आहे. माझ्या कार्यकाळाची चार वर्षे शिल्लक आहेत. तसा प्रश्न का विचारण्यात येत आहे, याबाबत मला माहित नाही. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा फोन आल्यानंतर पंतप्रधान मोदींनी शरणागती पत्करल्याची टीका काँग्रेसकडून करण्यात येत आहेत. त्याबाबत थरुर म्हणाले, ''लोकशाहीमध्ये ही सामान्य गोष्ट आहे. राजकीय पक्ष टीका करतात. निवडणूक लढवितात आणि मागण्याही करतात. आम्ही येथे पक्षाच्या राजकीय मोहिमेवर आलेलो नाही. आम्ही येथे संपूर्ण भारताचे प्रतिनिधी म्हणून आलो आहोत. सर्वपक्षीय शिष्टमंडळात तीन धर्म आणि सात राज्य, पाच राजकीय पक्षांचे सदस्य आहेत, याकडं त्यांनी लक्ष वेधले.

## लाडक्या बहिणींनो बँक खातं तपासा, दीड हजार रुपये येण्यास सुरुवात

### अकराव्या हप्त्याविषयी आदिती तटकरेंनी दिली महत्त्वाची माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मे महिन्याचा हप्ता कधी येणार असा प्रश्न सातत्याने विचारला जात होता. या प्रश्नाचं उत्तर आता मिळालं असून या योजनेतील सन्माननिधीच्या वितरणाला आजपासून सुरुवात झाली आहे. अनेकांच्या खात्यात पैसे जमा झाले असून आधार कार्ड लिंक असलेल्या बँक खात्यात हे पैसे जमा झालेत की नाही हे तपासण्याचं आवाहन केलं जात आहे. महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी यासंदर्भातील एक्सवर माहिती दिली आहे.

गेल्यावर्षी जुलै २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारने मु'यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्याचे आश्वासित करण्यात आले. त्यानुसार, ऑगस्ट महिन्यापासून हा लाभ पात्र महिलांच्या खात्यात जमा करण्यात आला. ऑक्टोबर महिन्यापर्यंत सरकारने या



योजनेसाठी महिलांना अर्ज करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार, आतापर्यंत कोट्यवधी महिलांनी या योजनेसाठी अर्ज भरले आणि पात्रही झाले. एप्रिल महिन्यापर्यंत महिलांना १० हप्त्यांचे पैसे मिळाले आहेत, तर मे महिन्याचा ११ वा हप्ताही महिलांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

एप्रिल महिन्याचा हप्ता गुढीपाडव्यापासून देण्यात आला होता. त्यामुळे मे महिन्याचाही हप्ता मे महिन्याच्या शेवटच्या दिवशी मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र, मे महिना उलटला तरीही हप्ता खात्यात जमा न झाल्याने अनेकांनी चिंता व्यक्त केली. त्यातच, छाननी प्रकि्या सुरू झाल्याने आपलाही अर्ज बाद झाला की काय अशी शंका अनेक पात्र महिलांना वाटू लागली. दरम्यान, जानेवारी महिन्यापासून अनेक पात्र महिलांच्या अर्जाची छाननी प्रकि्या सुरू करण्यात आली असून यामधून जवळपास लाखो सरकारी कर्मचारी महिलांचे अर्ज बाद ठरवण्यात आले आहेत. तर, विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांनाही अपात्र करण्यात आलं आहे. या छाननी प्रकि्येतून यशस्वी ठरलेल्या पात्र म हिलांच्या खात्यात आता दीड हजार रुपये जमा केले जात आहे.

## सोन्याच्या भावात पुन्हा दरवाढ, मुंबईत १ लाख पार; लगीनसराईत उतरलेले दागिन्यांचे भाव वधारले

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : सोन्याच्या दरात हळू हळू पण गेल्या दोन महिन्यांपूर्वी मोठी दरवाढ झाल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे, सोन्याचा (उदट्) दर प्रति तोळा १ लाख रुपयांवर पोहोचला होता. त्यानंतर, सोन्याच्या दरात चढ–उतार होताना दिसून येत आहे. कधी कमी, कधी जास्त असं करत सोने दरात पुन्हा भाववाढ झाली असून सोनं पुन्हा लाख मोलाचं बनलं आहे. सोन्याच्या किंमतींनी आज पुन्हा १ लाख रुपयांचा आकडा पार केला आहे. म ुंबईत (श्ल्स्ंर्ग) सोन्याचा दर आज प्रति १० ग्रॅम म्हणजेच प्रति तोळा १ लाख २०० रुपयांवर पोहोचला आहे. जीएसटी (उएऊ) बिलासह सोन्याचा दर लाखांच्या पार गेला आहे. गत म हिन्यात लगीनसराई असल्याने सोनं खरेदीसाठी ग्राहकांची दुकानात गर्दी दिसून आली. त्यावेळी, काही प्रमाणात सोन्याच्या दरात कपात झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला होता.

## आरोग्यमंत्र्यांच्या पत्नीचा सायलंट अटॅकने मृत्यू: रात्री जेवण करुन झोपी गेल्या, सकाळी उठल्याच नाहीत

**जयपूर** : राजस्थान सरकारमधील आरोग्यमंत्री गजेंद्र सिंह खिंवसार यांच्या पत्नी प्रीती कुमारी यांचे आज अचानक निधन झाले. प्राथमिक माहितीनुसार, त्यांना सायलेंट हृदयविकाराचा झटका आला, ज्यामुळे त्यांचे झोपेतच निधन झाले. कुटुंबातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी रात्री प्रीती कुमारी यांनी जेवण करून झोपी गेल्या. गुरुवारी सकाळी बराच वेळ त्या उठल्या नाहीत तेव्हा कुटुंबाने उठवण्याचा प्रयत्न केला, पण कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर त्यांना ताबडतोब रुग्णालयात नेण्याचा निर्णय घेण्यात आला. सुरुवातीला तिला एसएमएस रुग्णालयात नेण्याची योजना होती, परंतु वाटेत दुर्लभजी रुग्णालय जवळ असल्याने कुटुंबाने तिला तेथे नेले. दुर्दैवाने, डॉक्टरांनी प्राथमिक उपचारानंतर मृत घोषित केले. असे सांगितले जात आहे की डॉक्टरांचे एक पथकही मंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचले आणि तिथं सीपीआर आणि इतर जीव वाचवण्याचे प्रयत्न करण्यात आले. परंतु प्रकृतीत कोणतीही सुधारणा झाली नाही. डॉक्टरांच्या मते, प्रीती कुमारील यांना सायलंट हृदयविकाराचा झटका आला होता, ज्यामध्ये हृदयविकाराची कोणतीही सामान्य लक्षणे दिसत नाहीत आणि रुग्णाला वेदना किंवा अस्वस्थता जाणवत नाही. यामुळेच कोणालाही बिघडत्या तब्येतीची कल्पनाही आली नाही आणि ती झोपेतच मृत्यू झाला.

## माजी आमदार दिलीप सानंदांनी काँग्रेसला ठोकला रामराम, कोणता झेंडा घेणार हाती?

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील खाम गाव मतदारसंघातील तीन टर्म सलग काँग्रेसचे प्रतिनिधित्व करणारे निष्ठावंत आणि ज्येष्ठ माजी आमदार दिलीप सानंदा हे अखेर १२ जून रोजी राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. त्यांनी काँग्रेसच्या सदस्य पदाचा राजीनामा दिला असून, त्यांच्या पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमाची जय्यत तयारी खाम गावमध्ये सुरू करण्यात आली आहे. जवळपास २५ हजार छत्र्या, २५ हजार घडाळी आणि २५ हजार फोटो अशी दिमाखदार तयारी करण्यात आलीय. या पक्षप्रवेशाच्या वेळेस राष्ट्रवादी अजित पवार गटाचे महत्त्वाचे नेते आणि मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित राहणार असल्याचंही बोललं जातंय.

काँग्रेसला मोठी गळती : काही दिवसांपासून दिलीप सानंदा हे काँग्रेसमध्ये अस्वस्थ होते. तरी देखील ''जप तक जिंदा हू काँग्रेस का परिंदा हु'', असं म्हणत ते वेट अँड वॉचची भूमिका घेत होते. मात्र आता त्यांनी काँग्रेसच्या सदस्य पदाचा राजीनामा दिल्यानंतर संपूर्ण जिल्ह्यासह राज्यात एकच खळबळ उडाली आहे.

CMYK

## १८ वर्षाची प्रतीक्षा संपली ; आरसीबीचे ऐतिहासिक जेतेपद!

इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएलच्या अठराव्या हंगामाची नुकतीच सांगता झाली. मंगळवारी झालेल्या रोमहर्षक अंतिम सामन्यात रजत पाटीदारच्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने श्रेयस अय्यरच्या पंजाब सुपर किंग्स संघाला सहा धावांनी नमवत पहिल्यांदाच आयपीएल ट्रॉफीवर नाव कोरत इतिहास रचला. आरसीबीने अठराव्या वर्षी हे ऐतिहासिक विजेतेपद मिळवून १८ वर्षाची प्रतीक्षा संपवली. गेली १८ वर्ष आरसीबीचे आजी – माजी खेळाडू, प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ आणि आरसीबीचे चाहते ज्या क्षणाची वाट पाहत होते तो क्षण आला आणि आरसीबीचा महान खेळाडू विराट कोहली भावूक झाला. आरसीबीच्या विजयावर शिक्कामोर्तब झाल्यावर विराट कोहलीच्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागले. लहान मुलासारखा विराट रडू लागला. कधी जमिनीत तोंड खुपसून तर कधी आपल्या आजी माजी सहकाऱ्यांच्या गळ्यात पडून तर कधी आपल्या पत्नीच्या गळ्यात पडून तो रडू लागला. विराटला इतके भावूक झाल्याचे याआधी कधी पाहिले नाही. मैदानावर नेहमी आक्रमक राहणारा विराट पहिल्यांदाच इतका भावूक झाला आणि त्याने आपल्या आनंदाश्रुंना वाट मोकळी करून दिली. अर्थात हे आनंदाश्रु होते १८ वर्ष पाहिलेले स्वप्न साकार झाल्याचे. हे फक्त आनंदाश्रु नव्हते तर त्यामागे त्याने केलेली मेहनत, जिद्द आणि त्याची हार न मानण्याची वृत्ती. आपल्या संघाला आयपीएलचे विजेतेपद मिळवून द्यायचेच असा चंग त्याने बांधला पण त्यात त्याला यश येत नव्हते. यावेळी मात्र त्याला त्यात यश आले आणि विराट सोबतच मैदानावरील आणि आणि टीव्ही, मोबाईलवर सामना पाहणाऱ्या करोडो क्रिकेट प्रेमींनी एकच जल्लोष केला. जो तो विराट कोहलीचे आणि आरसीबी संघाचे कौतुक करू लागला. घराघरात आणि सोशल मीडियावर आरसीबी संघाचे अभिनंदन करण्याची स्पर्धा सुरू झाली. अर्थात आरसीबी संघांसाठी हे विजेतेपद सोपे नव्हते कारण अंतिम सामन्यात पोहचलेले दोन्ही संघ हे तुल्यबळ होते. दोघांनीही साखळी सामन्यात चांगली कामगिरी करून पॉईंट टेबलवर पहिले आणि दुसरे स्थान पटकावले होते त्यामुळे अंतिम सामना रंगतदार होणार यात कोणालाही शंका नव्हती. पहिली फलंदाजी करताना आरसीबीने अपेक्षेप्रमाणे चांगली फलंदाजी करत १९० धावा काढल्या. विराट कोहली, रजत पाटीदार, जितेश शर्मा यांनी चांगली फलंदाजी केली मात्र पंजाबच्या गोलंदाजांनी त्यांना २०० धावा काढून दिल्या नाहीत. अर्शदीप सिंग आणि काईल जेमिन्सन यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. १९१ धावांचा पाठलाग करताना पंजाबने चांगली सुरुवात केली प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी चांगली सलामी दिली दोघांनीही पहिल्या गाड्यांसाठी ४३ धावा काढल्या. जॉस इंग्लिसने २३ चेंडूत ३९ धावा काढून सामन्यात रंगत आणली मात्र श्रेयस अय्यर पुन्हा एकदा आरसीबी विरुद्ध फ्लॉप ठरला. अवघी १ धाव काढून तो माघारी फिरला. तिथेच सामना आरसीबीच्या बाजूने झुकला. अखेरच्या षटकात नेहाल वढेरा आणि शशांक सिंग यांनी झुंज दिली पण ती अपुरी ठरली. पंजाबचा संघ १८४ धावाच काढू शकला आणि आरसीबीने सहा धावांनी विजय मिळवला. आरसीबीच्या या विजयात त्यांच्या गोलंदाजांचे मोलाचे योगदान होते. त्यांनी अतिशय शिस्तबद्ध मारा केला. भुवनेश्वर कुमार आणि कृणाल पांड्याने प्रत्येकी दोन बळी घेतले.त्यांच्या अचूक माऱ्याने पंजाबच्या फलंदाजांना वेगाने धावा काढता आल्या नाहीत. कृणालाने तर चार षटकात अवध्या सतरा धावा देत दोन गडी बाद केले म्हणूनच त्याला प्लेअर ऑफ द मॅच हा पुरस्कार देण्यात आला. आरसीबीच्या इतर गोलंदाजांनीही चांगली गोलंदाजी केली आणि आपल्या संघाला विजयी करत संघातील खेळाडूंसह चाहत्यांना जल्लोष करण्याची संधी निर्माण करून दिली. ऐतिहासिक विजेतेपद मिळवणाऱ्या आरसीबी संघाचे मनापासून अभिनंदन!

# दहशतवाद कारवाई नंतर शिष्टाई करण्यासाठी विदेशात गेलेले शिवसेनेचे गटनेते खा. डॉ.श्रीकांत शिंदे यांचा केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला सत्कार

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पाकीस्तान दहशतवादयांना आश्रय देतात या दहशतवाद्यांचा त्रास भारतासोबतच युएई, युको, अमेरीका या देशांनाही बसत आहे. संपुर्ण जगातुन दहशतवाद संपुष्टात आणण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन दहशतवादाचा बिमोड करणे गरजेचे आहे. अस हे पटवुन देण्यात शिवसेनेचे गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या शिष्टमंडळ यशस्वी झाल. अस मत व्यक्त करत केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव यांनी त्यांचा गौरव करत सत्कार केला. पहेलगाम येथे भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी हल्ला चढविला या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यु झाला. त्यानंतर भारताच्यावतीने ऑपरेशन सिंदुर राबविण्या आले. यामध्ये पाकीस्तानातील दहशतवाद्यांचे स्थळ नष्ट करण्यात आले. भारताने केलेल्या कारवाईची माहिती देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतुन खासदारांच्या नेतृत्वात सर्वपक्षीय शिष्टमंडळ विविध देशांच्या दौऱ्यावर पाठविण्यात आले होते. यातीलच पहिल शिष्टमंडळ शिवसेनेचे खासदार डॉ.श्रीकांत एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वातील सर्व पक्षीय खासदारांचे शिष्टमंडळ पश्चिम अफ्रिकेतील युएई, लायबेरीया, काँगो, सिएरा, लिओन या देशांच्या दौऱ्यावर गेले होते. हा दौरा आटपुन आल्यानंतर केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव व शिवसेनेचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्यात



नुकतीच औपचारीक चर्चा झाली या चर्चेत त्यांनी सांगीतले की, दोन राष्ट्रांनी भारताने केलेल्या कारवाईचा खुले समर्थने केले. दहशतवाद संपुष्टात आणण्यासाठी भारतासोबत असल्याचे त्यांनी सांगीतले. भारताने उचलले पाऊल हे दहशतवाद संपविण्यासाठी महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगीतले. दहशतवाद्यांना पोसण्याचे काम पाकीस्तान करत आहे. या दहशतवाद्यांचा प्रत्येक देशाला त्रास होत आहे. दहशतवाद्य संपुष्टात आणण्यासाठी प्रत्येक देशांनी दहशतवाद विरोधात पुढाकार घेणे गरजेचे आहे. हे विषय पटवुन देण्यात शिवसेनेचे गटनेते खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या शिष्टमंडळ यशस्वी झाले. असे गौरद्गार केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त करुन त्यांचा सत्कारही केला. दिल्ली येथे केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव व श्रीकांत एकनाथराव शिंदे यांच्यामध्ये जवळपास अर्धा तास औपचारीक चर्चा झाली. यावेळी शिवसेना नेते संजय निरुपम उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय दहशतवादा विरुध्द भारताचा जगासमोर मांडण्यासाठी शिवसेना पक्षाला देण्यात आलेली संधी शिवसेनेसाठी अभिमास्पद आहे.

# जिल्हा कारागृहात वृक्षारोपणाने जागतिक पर्यावरण दिन साजरा



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा कारागृह व सामाजिक वनिकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन जिल्हा कारागृह परिसरात आंबा, सिताफळ, शेवगा, बांबु, तुळस अशा विविध प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण करुन जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

अपर पोलीस महासंचालक डॉ. सुहास वारके, कारागृह उपमहानिरीक्षक स्वाती साठे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात कारागृह अधीक्षक संदिप भुतेकर व डीएफओ विपुल राठोड यांच्या हस्ते वृक्षारोपणाने करण्यात आली.

यावेळी वरिष्ठ तुरुंगाधिकारी मेघा बाहेकर, सहायक कृषी अधिकारी




गजानन सांगळे, वनक्षेत्रपाल पी. आर. तोंडीलायता, वनपाल गजानन डोईफोडे, व्ही.एस. बकाल, ए.ए.गीते, आ. बी. नेवरे, वनरक्षक लक्ष्मी जाधव यांच्यासह कारागृहातील अधिकारी व कर्मचारी तसेच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

पान १ वरून...

# समृद्धी महामार्ग रेकॉर्डब्रेक वेळेत पूर्ण

मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी दुसऱ्या टप्प्याचे, दादा भुसे यांनी तिसऱ्या टप्प्याचे तर मी याच्या शेवटच्या टप्प्याचे उद्घाटन करत आहे. या महामार्गावर ७३ पूल आहेत. वन्य जीवांना धोका पोचू नये यासाठी अंडर पास आणि ओव्हर पास बनवले आहेत.

शेवटचा टप्पा ७६ किमी आहे. यामध्ये ५ जुळे बोगदे आहेत. हा सर्वात जास्त लांबीचा हा बोगदा आहे. ६० डिग्री तापमान झाल्यास आपोआप पाणी सुरू होते आणि तापमान कमी झाल्यास आपोआप बंद होते. हे सगळे बोगदे एकमेकांना जोडले आहेत. यात २०० मेगावॉट सौर ऊर्जा निर्माण करण्याची तयारी आपण केली आहे. २२ ठिकाणी सुविधा केंद्र असतील.

हा स्मार्ट रोड म्हणून विकसित करण्यात येत आहे. गेल कंपनीने संपूर्ण एक गॅस पाइपलाइन टाकली आहे. त्यामुळे जेवढे उद्योग या रस्त्याच्या बाजूला आहेत तिथे गॅस पुरवला जाईल. गडचिरोली इथे स्टील उद्योगाला गॅस पुरवला जाईल. शिर्डी, अजिंठा अशी ट्रॅफिक १० लाख प्रति महिना सुरू आहे. ती आधी २ लाख होती. आता शेवटच्या टप्प्यामुळे यात अजून वाढ होईल. वाशीच्या पुलावर ट्रॅफिक जॅम होते. ते कमी करण्यासाठी वाशीच्या पुलाचे लोकार्पण करत आहोत.

जेव्हा काम सुरू केले तेव्हा अनेकांना वाटत होते की हे काम होणार नाही. पण आम्ही ते करून दाखवले. महायुतीच्या काळात याचे काम सुरू केले आणि आनंद आहे की महायुतीच्या काळात याचे लोकार्पण केले आहे. यापुढे आपल्याला शक्तिपीठ महामार्ग करायचा आहे. मराठवाड्याचं आर्थिक आणि औद्योगिक चित्र बदलणारा शक्तिपीठ महामार्ग आहे.

आज शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झाले. मी खूप खूप शुभेच्छा देतो. हा देशातला सर्वात जास्त लांबीचा आणि गेम चेंजर प्रकल्प पूर्ण झालेला आहे. हा सगळ्यात कठीण प्रकल्प होता. सुरुवातीला काही लोक हा रस्ता होऊ नये यासाठी प्रयत्न करत होते. पण मला मुख्यमंत्र्यांनी सांगितले की हा रस्ता करायचा आहे. त्यामुळे विदर्भात देखील औद्योगीकरण होईल. प्रवासाला १८ नाही तर ८ तास लागणार आहेत.

पर्यावरण पूरक असा हा प्रकल्प आहे. या रस्त्याच्या बाजूला आपण शेततळी केली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. आपण ११ लाख मोठी झाडे आणि २२ लाख लहान झाडे लावतोय.

पहिल्या टप्प्यावेळी काही लोक घाई करत होते. औद्योगिक विकासाला चालना देणारा हा रस्ता ठरेल. नागपूरवरून सकाळी निघालेला शेतकरी संध्याकाळी मार्केटमध्ये पोहोचेल. या आधी तीन दिवसांनी तो पोहोचायचा.

शक्तिपीठाचा उल्लेख मुख्यमंत्री यांनी केला. मराठवाड्याला, पश्चिम महाराष्ट्राला आणि कोकणाला देखील त्याचा फायदा होईल. समृद्धी महामार्गाला देखील काही राजकीय लोकांनी विरोध केला. पण शेतकऱ्यांना त्याचा आता फायदा झाला.शक्तिपीठ देखील फायद्याचा ठरेल.

हा प्रकल्प सुरू होत असताना अनेकांनी विरोध केला. संभाजीनगर ला हॉल मध्ये मीटिंगमध्ये आम्हाला विरोध करायला सांगितला. नंतर ज्यावेळी दर जाहीर केला तेव्हा ज्यांनी विरोध करायला लावला त्यांनी जाऊन पैसे घेतले. ५५ हजार ५०० कोटींची खर्च होता पण बजेट ६१ हजारांवर गेले. १२ कोटी सिमेंट बॅग इथे लागल्या आहेत. फार मोठ काम राज्यासाठी झाले आहे.

मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी सुरवात केली आणि आता ते मुख्यमंत्री असतानाच या रस्त्याचं उद्घाटन झालं, असे क्वचित होतं.एकनाथ शिंदे यांचे योगदान लाभले हे विसरून चालणार नाही. आमच्या ऑडी गाडीचे सारथ्य एकनाथ शिंदे यांनी केले.

# सतत पाईपलाईन फुटत असल्यामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** मागील महिन्याभरापासून आडोळ धरणापासून तर रिसोड शहरापर्यंत कुठे ना कुठे पाईपलाईन फुटत असल्यामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे लाखो लिटर पाण्याची नासाडी होत असून पाईपलाईन फोडणाऱ्या वर कठोर कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.

रिसोड शहराला आडोळ धरणा वरून पाणीपुरवठा केल्या जातो मागील एक महिन्यापासून शेतीच्या मशागतीची कामे तसेच शहरातील वाशिम रोड लगतच्या वसाहतीमध्ये नाली व इतर खोदकामे जेसीबीच्या द्वारे केल्या जात आहे जेसीबीने खोदकाम करते वेळेस पाई फ ुटण्याच्या घटनेमध्ये सतत वाढ होत आहे परिणामी महिन्यापासून रिसोड शहरात पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाणी वाया जाण्याच्या घटनेमध्ये सातत्याने वाढ होत आहे. यामुळे रिसोड शहराच्या पाणीपुरवठ्यावर सुद्धा परिणाम होऊन पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे. पहिलेच शहराच्या पाणीपुरवठा ला विविध प्रकारचे ग्रहण लागले आहे. विद्युत पुरवठा खंडित होणे,



पाईपलाईन फुटणे व अन्य तांत्रिक बाबीमुळे

## पाईपलाईन फुटण्याच्या घटनेमध्ये वाढ – कठोर कारवाईची गरज

पाणीपुरवठा विस्कळीत झालेला असल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. यातच पाईपलाईन फुटल्याने पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेवर परिणाम होणे हे नित्याचीच बाब झाली आहे. दिनांक एक जून रोजी दुपारी दीड वाजताच्या दरम्यान रिसोड वाशिम मार्गावर महेश कॉलनी मध्ये जेसीबी चे माध्यमातून नालीचे खोदकाम करत असताना पुन्हा एकदा पाईपलाईन फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले. रिसोड नगर परिषद कर्मचाऱ्यांनी सदर पाईपलाईन दुरुस्तीचे काम तातडीने केले असले तरी यामधून लाखो लिटर पाणी वाचू शकले नाही. आडोळ धरणावरून रिसोड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी मुख्य पाईपलाईन रिसोड पर्यंत टाकण्यात आलेली आहे. मात्र कधी शेतकरी शेतात काम करत असताना नागरच्या माध्यमातून, ट्रॅक्टरच्या माध्यमातून तर जेसीबी चे माध्यमातून पाईपलाईन फुटण्याच्या घटना गेले अनेक दिवसापासून सातत्याने सुरू आहे.नगरपरिषदेने याकडे लक्ष घालून सदर पाईपलाईन असलेल्या ठिकाणी स्थानिक नागरिकांना शेतकऱ्यांना याबाबत सूचना द्यावी किंवा ज्या ठिकाणाहून पाईपलाईन गेली आहे त्या ठिकाणी मार्किंग करावी अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. तसेच पाईपलाईन फोडणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सदर पाईपलाइनचा सर्वे करून शहरातील नागरिक लेआउट धारक यांना याबाबत नोटीस देऊन सदर बाबीची सूचना देण्यात येईल व पाईपलाईन फुटण्याच्या घटना रोखण्यास उपाययोजना करण्यात येईल.


**–सतीश शेवदा**
**मुख्याधिकारी नप रिसोड.**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### ८ जुन पासून बच्चू कडू बसणार बेमुदत आमरण उपोषणाला



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** शेतकऱ्याची संपूर्ण कर्जमाफी करा, दिव्यांग व विधवा महिलांना ६ हजार रुपये मानधन द्या, मनरेगा वरील मजुरी ३१२ रुपये वरून ५०० रुपये करा, पेरणी ते कापणी पर्यंत सर्व कामे MREGS मध्ये घ्या, मुख्यमंत्र्यांसोबत ७ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीतील मागण्यांचा शासन निर्णय काढा यासह विविध मागणीसाठी बच्चू कडू अन्नत्याग आंदोलन करणार आहेत. अमरावती शहरातील गाडगे बाबा समाधी मंदिर ते गुरुकुंज मोझरी अशी १५ ते २० हजार लोकांची बाईक रॅली काढून गुरुकुंज मोझरी येथे सभा घेऊन सभेचे रूपांतर अन्नत्याग आंदोलनात होईल अशी माहिती बच्चू कडू यांनी दिली. त्यामुळे ८ तारखेपूर्वी बच्चू कडू यांच्या मागण्यांवर सरकार विचार करणार का? याकडे लक्ष लागल आहे. कारण बच्चू कडू यांच्या आंदोलनाला राज्यभरातून प्रहारचे कार्यकर्ते येण्याची शक्यता आहे.

### जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतल्यास पाणी व घरपट्टी कर होणार माफ, अकोला जिल्हातल्या आळंदा ग्राम मंडळाचा निर्णय



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोला जिल्ह्यातल्या बार्शीटाकळी तालुक्यातील आळंदा ग्रामपंचायतनं एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. की शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी एक उल्लेखनीय निर्णय घेत गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत या नवीन शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला. तर विद्यार्थ्यांच्या पालकांना पाणीपट्टी व घरपट्टी कर माफ करण्यात येणार आहे. तर असा हा निर्णय ग्रामसभा व सरपंच दत्ता ढोरे यांच्या नेतृत्त्वात घेण्यात आला आहे. तर विशेष म्हणजे निर्णय घेतल्यानंतर आळंदा जिल्हा परिषद शाळेला मोठा फायदा झाला असून यंदा या शाळेमध्ये १२ विद्यार्थ्यांची पट संख्या वाढली आहे. तर आळंदा ग्रामपंचायतने घेतलेल्या या निर्णयाचं सर्वत्र कौतुक होत आहे. तर इतकेच नव्हे तर आळंदा पाठोपाठ महान आणि तेल्हारा तालुक्यातील आणखी एका ग्रामपंचायतीने असा निर्णय लागू केला. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेतील पटसंख्या वाढेल अशी आशा आहे.

### चिखली येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शुक्रवारी शिवराज्यभिषेक दिनाचे आयोजन



दैनिक आपला विदर्भ


**बुलढाणा/प्रतिनिधी :** चिखली शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे शुक्रवार दि. ६ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता शिवराज्यभिषेक दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजक नाविन्यता विभाग व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाचे मंत्री ना. मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून शिवराज्यभिषेक साजरा करण्यात येणार आहे. शिवराज्यभिषेक दिनाचे उद्घाटन ऑनलाईन पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे शुभ हस्ते होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथि म्हणून आमदार श्वेताताई महाले, आयएमसी अध्यक्ष सुधीर तांबट तसेच प्रमुख वक्ते म्हणून डॉ. केदार ठोसर, प्रशांत देशमुख प्रशिक्षणार्थ्यांना नागरी कर्तव्य व शिष्टाचार, स्वदेशी विचारांचा प्रचार, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, याबाबत मार्गदर्शन करणार आहे. तरी या कार्यक्रमास माजी प्रशिक्षणार्थी व पालकांनी तसेच चिखली तालुक्यातील नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी केले आहे.

शिवसेना मुख्य नेते एकनाथराव शिंदे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांच्या उपस्थितीत

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष अनुजाताई सावळे, सरचिटणीस सरलाताई बाहेकर आणि उबाटा महिला आघाडी प्रमुख जिजाबाई राठोड यांचा शिवसेनेत प्रवेश

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** शिवसेना पक्षाचे मुख्यनेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रमुख उपस्थिती राष्ट्रवादी काँग्रेस ( मा.आजित पवार ) गटाच्या जिल्हाध्यक्ष सौ.अनुजाताई सावळे पाटील आणि उबाठा गटाच्या महिला आघाडी प्रमुख सौ.जिजाताई राठोड व राष्ट्रवादी काँग्रेस (मा.आजित पवार )गट महिला सरचिटणीस सौ. सरलाताई बाहेकर यांनी शिवसेनेत पक्षप्रवेश केला. आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती नगर परिषदेच्या निवडणुक पार्श्वभूमीवर हे पक्षप्रवेश जिल्हयात शिवसेनेला संघटनात्मक मजबुती देणारे ठरणार आहेत.

मुंबई येथील शिवसेना पक्षाच्या कार्यालयामध्ये ३ जून रोजी हा पक्षप्रवेश सोहळा शिवसेनेचे मुख्यनेते राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे शिवसेनेचे नेते तथा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव शिवसेना सचिव संजय मोरे शिवसेनेचे जिल्हा संघटक तथा आमदार संजय गायकवाड शिवसेना प्रवक्त्या प्रा.ज्योती वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस ( मा.आजित पवार ) गटाच्या जिल्हाध्यक्ष सौ.अनुजाताई सावळे पाटील आणि उबाठा गटाच्या महिला आघाडी प्रमुख सौ.जिजाताई राठोड व राष्ट्रवादी काँग्रेस (मा.आजित पवार )गट महिला सरचिटणीस सौ.सरलाताई बाहेकर यांच्यासह बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील श्री.जयकुमार सरकटे,श्री.अरुण अंभोरे,सौ.दीपाली वाचोळ,सौ. दीपाली पवार,सौ.विश्रांती जाधव श्री.विजय राठोड, सौ.संगीता पवार, सौ.दिपाली वायचोळ आणि कार्यकर्त्यांनीही यावेळी शिवसेना पक्षात प्रवेश केला.मुंबईतील शिवसेना पक्ष कार्यालयात झालेल्या या पक्ष प्रवेश सोहळ्याला शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष डीवरे, संजय हाडे बुलढाणा जिल्ह्यातील शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते हे उपस्थित होते येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेमध्ये झालेला हा पक्षप्रवेश शिवसेनेला जिल्ह्यात संघटनात्मक उभारी देणारा ठरणार आहे

## जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने एक पेड माँ के नाम प्राचार्य डॉक्टर विजय नागरे



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** स्थानिक दुसरबीड येथे नारायणराव नागरे महाविद्यालयमध्ये दिनांक ५ जून २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिन चे औचित्य साधून वृक्ष लागवड जनजागृती करण्याच्या हेतूने भारत सरकारने राबवलेल्या उपक्रम एक वृक्ष माँ के नाम, हा उपक्रम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने राबवण्यात आला . पुढील पंधरा दिवसांमध्ये जनजागृती पटनाट्य वृक्ष लागवड चर्चा असेल तर निबंध स्पर्धा पोस्टर प्रेसेंटेशन असे विविध उपक्रम राबविण्याचे विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व प्राचार्य डॉ . विजय नागरे अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांनी मार्गदर्शन केले यावेळी भगवान व महाविद्यालय सिंदखेड राजा येथील प्राध्यापक डॉक्टर पंढरीनाथ डोईफोडे व उत्कर्ष महाविद्यालय सिंदखेडराजा येथील प्राध्यापक खरात उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक दीपक देशमाने कार्यक्रम नियोजन प्राध्यापक डॉक्टर गणेश विजय प्राध्यापक देवानंद नागरे श्री गजानन मुंडे श्री बालू पंढरे विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत

### अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांचा जिल्हा दौरा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ मर्यादीत, मुंबई अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील(मंत्री दर्जा) हे दि. ६ ते ८ जून २०२५ दरम्यान शेगाव, जि. बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार तुळजापुर येथून रात्री ८ वाजता शासकीय विश्रामगृह शेगाव जि. बुलढाणा येथे आगमन व राखीव. शनिवार दि. ७ जुन रोजी सकाळी १० वाजता श्री गजानन महाराज शेगाव दर्शनासाठी उपस्थिती. दुपारी १२ वाजता शासकीय विश्रामगृह शेगाव येथे राखीव व मुक्काम. रविवार दि. ८ जून रोजी दुपारी १२ वाजता शेगाव येथे खाजगी लग्न समारंभासाठी उपस्थिती व दुपारी २ वाजता शेगाव येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

## जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा; २६ जुनपर्यंत अर्ज करा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हास्तरीय सुब्रोता फुटबॉल कप, सबज्युनियर मुले, ज्युनियर मुले, मुली क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. दि. ३ ते ५ जुलै दरम्यान विविध वयोगटाच्या स्पर्धा घेण्यात येणार आहे. क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील शाळा, संघांनी दि. २६ जूनपर्यंत ऑफलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी केले आहे.

जिल्हा क्रीडा परिषद तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा व सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी, नवी दिल्ली यांच्या मार्फत २०२५-२६ या वर्षासाठी या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूसाठी सबज्युनियर १५ वर्षा आतील मुले क्रीडा स्पर्धेसाठी खेळाडू दि. १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. तसेच ज्युनियर १७ वर्षाखालील मुले, मुली दि. १ जानेवारी २००९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा.

जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप सबज्युनियर, ज्युनियर क्रीडा स्पर्धेत सहभागी सर्व संघानी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापूर्वीच subrotocup.in या संकेतस्थळावर खेळाडू आणि संघांनी नोंदणी करणे अनिवार्य आहे. सहभागी होणाऱ्या संघांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात ऑफलाईन नोंदणी दि. २६ जुनपर्यंत करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्जावर खेळाडूचे संपुर्ण नांव, जन्मतारीख, वर्ग, आधार क्रमांक, शाळेचे नांव, पत्ता, शाळेचा युडायस क्रमांक, खेळाडू स्वाक्षरी, रजिष्टर नंबर, मोबाईल क्रमांक, संस्था प्रमुख, मुख्याध्यापक यांचे स्वाक्षरीने पाठवावा. १५ वर्षाआतील खेळाडूंकरीता वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक आहे.

या स्पर्धेत सहभागी १५ वर्षाआतील मुले व १७ वर्षा आतील मुले, मुली यांची स्पर्धा दि. ३ ते ५ जुलै २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शाळा, संघांनी सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑफलाईन नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी डॉ.जिवन मोहोड, राज्य क्रीडा मार्गदर्शक (फुटबॉल) यांचेशी कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडा नगरी, जांभरुन रोड, बुलढाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस.महानकर यांनी केले आहे.

## महाडीबीटी पोर्टलवरून प्रमाणित बियाणे वितरण व पीक प्रात्यक्षिकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अन्न व पोषण अभियान व राष्ट्रीय खाद्यतेल अभियान सन २०२५-२६ अंतर्गत खरीप हंगामासाठी जिल्ह्याला लक्षांक प्राप्त झाला आहे. या योजनेंतर्गत तूर, मूग, उडीद, कापूस, सोयाबीन आणि तीळ या पिकांसाठी पीक प्रात्यक्षिके व प्रमाणित बियाणे वितरण या घटकांसाठी शेतकरी गट, उत्पादक कंपनी, सहकारी संस्था व वैयक्तिक शेतकरी यांच्याकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

पिक प्रात्याक्षिकामध्ये सहभागी होण्याकरिता ३१ मार्च २०२४ पूर्वी नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, कृषि क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी संस्था महाडीबीटी प्रणालीद्वारे अर्ज करू शकतात. गटातील प्रत्येक शेतकऱ्यांचे शेतकरी ओळखपत्र आवश्यक असून एका कुटुंबात एका शेतकरी लाभार्थ्याकरिता ०.४० हेक्टरचा लाभ घेता येईल. १० हेक्टर चा एक गट याप्रमाणे २५ शेतकरी असणे आवश्यक आहे. ज्या गटात २५ पेक्षा जास्त शेतकरी असतील तर त्यातील २५ शेतकऱ्यांची निवड करावी. किंवा जर गटात २५ पेक्षा कमी शेतकरी असल्यास गटाबाहेरील पात्र शेतकऱ्याची निवड करता येईल.प्रात्याक्षिका करिता निवड झालेल्या शेतकरी गटांना कृषि विभागामार्फत पुरविण्यात आलेल्या निविष्ठा व तंत्रज्ञानाचा वापर करणे तसेच प्रात्याक्षिक प्लॉटला तुलनात्मक प्लॉट असणे बंधनकारक आहे. तसेच निवड झालेल्या गटातील सर्व शेतकऱ्यांना मृद तपासणी करणे बंधनकारक राहील.

प्रमाणित बियाणे या घटकाकरिता ॲग्रिस्टक शेतकरी ओळखपत्र असलेले शेतकरी महाडीबीटी प्रणालीद्वारे अर्ज करू शकतात. किमान ०.२० हेक्टर ते १ हेक्टर क्षेत्राकरिता लागणारे मुंग,उडीद,तूर, सोयाबीन,तीळ आणि कापूस पिकाचे प्रमाणित बियाणे करिता शेतकरी धारण क्षेत्रानुसार अर्ज करू शकतात. लक्षांकाच्या मर्यादेत प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्याने लाभ देण्यात येईल. प्रमाणित बियाणे वितरण करिता पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना मृद तपासणी करणे आवश्यक आहे. लाभार्थ्यास पिक प्रात्यक्षिक किंवा प्रमाणित बियाणे वितरण लाभर्थीची निवड करुन महा.डी.बी.टी. पोर्टलवर पुढील दोन दिवसामध्ये लाभ घेता येईल. त्यानुसार ५ जून २०२५ रोजी प्रथम येणाऱ्यास प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वानुसार पहिली यादी प्रसिद्ध करण्यात येईल. जिल्ह्यातील शेतकरी गट, उत्पादक कंपनी, सहकारी संस्था व वैयक्तिक शेतकरी यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin/AgriLogin या लिंकव्दारे महाडीबीटी प्रणालीवर अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिक्षक मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# चक्क बैलगाडीतून निघाली नवरदेवाची वरात

## डोणगाव येथील गोळे कुटुंबीयांनी जपले जुन्या काळातील साधेपण

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** बुलढाण्याच्या डोणगाव मध्ये एक विवाह सोहळा पार पडला..ज्यामध्ये मुलीच्या लग्नासाठी आलेलं वऱ्हाड चक्क बैलगाडीतून अवतरलं, हा विवाह सोहळा सर्वांचं लक्ष वेधून घेणारा ठरला.

अतिशय साध्या पद्धतीने लग्न केल्यानंतर त्यांच्याकडे पाहून नाक मुरडणारे बरेच जण असतात, परंतु बुलढाणा जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यातील डोणगाव येथे झालेल्या लग्न समारंभात अनेक जण सेल्फी काढण्यासाठी धावपळ करतांना दिसून आले.. गणेश गोळे यांच्या शुभांगी या कन्येचं लग्न डोणगावपासून आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या शेलगाव देशमुख येथे जुळलं, अत्यंत साध्या आणि पारंपरिक पद्धतीने हे लग्न करण्याचं ठरल्याने या लग्न सोळव्यात महागाड्या मोटार वाहनांऐवजी बैलगाडी, बँडबाजा, डीजे ऐवजी बैलाच्या गळ्यातल्या घुंगराच्या माळांचा निनाद, तब्बल २० बैलगाड्यांमध्ये बसून आलेलं वऱ्हाड, त्यांनी परिधाण केलेला पारंपरिक व अस्सल महाराष्ट्रीयन पोशाख, वधू पित्याने नवदेवाच्या डोक्यावर ऊन लागूनये म्हणून धरलेली छत्री, गेल्या ३० वर्षांपासून कधीही गावात न शिरलेल्या रस्त्याने गावात पोहोचलेलं वऱ्हाड आणि गावातल्या मुख्य मार्गावर कुतूहलाने पाहणारं सारं गावं.. पवित्र अग्नीला साक्षी ठेऊन घेतलेले सात फेरे, त्यात साजूक तुपाची आहुती आणि पारंपरिक पद्धतीने रंगलेला हा विवाह सोहळा पाहण्यासाठी व विवाहचे साक्षीदार होण्यासाठी जमलेल्या सर्वच आप्तेष्टांना १९७० च्या दशकाची आठवण झाली, इतर पालकांनी देखील आपल्या मुला मुलीचे लग्न अतिशय साध्या पद्धतीने करावे, असे आवाहन गोळ्या कुटुंबीयांकडून केले जात आहे...





# बकरी ईद सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा करा - जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

■ गोवंश प्राण्यांची अवैध तस्करी होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी

■ जनावरांची वाहतूकीपुर्वी स्वास्थ्य तपासणी करून प्रमाणपत्र द्यावे

**दैनिक आपला विदर्भ**





**बुलढाणा/प्रतिनिधी :** येत्या ७ जून रोजी बकरी ईद सण जिल्ह्यात उत्सहात साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी शांतता व सौहार्दपूर्ण वातावरणात सण साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात शांतता, सलोखा व सामाजिक ऐक्य अबाधित राखण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीस पोलीस अधीक्षक निलेश ताबें, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुधीर खांदे, अपर पोलीस अधिक्षक बि.बि. महामूनी, निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसिलदार, पोलीस अधिकारी व विविध विभागांचे अधिकारी तसेच धर्मगुरू, सामाजिक संघटना प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, बकरी ईद सणाच्या निमित्ताने जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात जनावरांची वाहतुक करण्यात येते. याप्रसंगी पशुसंवर्धन विभागाने जनावरांची वाहतूकीपुर्वी स्वास्थ्य तपासणी करून प्रमाणपत्र द्यावे. पशुसंवर्धन विभागाने पोलीस विभागाच्या समन्वयाने जनावरांसाठी सुरक्षितता निर्माण करून जिल्ह्यात गोवंश प्राण्यांची अवैध तस्करी होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. जनावरांची अवैध वाहतुक आढळल्यास तसेच प्राणी क्लेश प्रतिबंध कायद्याचे पालन न झाल्यास त्वरीत पोलीसांना सूचित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

बकरी ईद उत्सवाच्या दरम्यान ग्रामीण व नागरी वस्तीमधील विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही, यांची खबरदारी घ्यावी. बाजारपेठ, कत्तलखाणे व इत्तर ठिकाणी स्वच्छता राहिल यांची दक्षता नगरपालिका व संबधितांनी घ्यावी, असे सूचना यावेळी दिल्या. तसेच सण उत्सवाच्या काळामध्ये समाजमाध्यमावर काही समाजकंठकाकडून धार्मिक तेढ निर्माण होणारे संदेश पसरवितात. अशा अफवावर विश्वास न ठेवता संदेश पसरविणाऱ्या व्यक्तीची माहिती पोलिसाकडे कळविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी केले.

पोलीस विभागाने शहर व गावांमध्ये बंदोबस्त योजना आखली असून, चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. तसेच राज्यात संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायदा लागू असून या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी व्हावी. वाहतूक करताना महाराष्ट्र मोटार वाहन कायद्याचे पालन व्हावे. कोणतीही अवैध कत्तल किंवा वाहतूक होऊ नये. धर्मगुरूंनी समाजात शांतता व बंधुभाव कायम ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन पोलीस अधिक्षक निलेश तांबे यांनी केले. तसेच सोशल मीडियावर अफवा पसरविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

बकरी ईदच्या दिवशी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजना आणि समन्वय साधण्याबाबत शातंता समिती सभामध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी विविध प्रतिनिधींनी आपले विचार मांडत शांततेत व सलोख्यात बकरी ईद साजरी करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# हळद लागवडीला सुरुवात

## हवामान विभागा च्या अंदाजाकडे दुर्लक्ष

**दैनिक आपला विदर्भ**



**रिसोड/प्रतिनिधी :** मान्सूनपूर्व पडलेल्या अवकाळी पावसामुळे जमिनीमध्ये ओलावा निर्माण झाल्यामुळे हळद उत्पादक शेतकऱ्यांनी हळद लागवडीला सुरुवात केली आहे हवामान विभागाने मात्र मान्सून दाखल झाला असला तरी सक्रिय नसल्याचा अंदाज व्यक्त केला आहे परंतु शेतकरी याकडे दुर्लक्ष करीत आहेत.

यावर्षी मे महिन्यातच जवळपास पंधरा दिवस अवकाळी पावसाने थैमान घातले होते त्यामुळे मागील पंधरवड्यात पावसाळी वातावरण निर्माण झाले होते अवकाळी पाऊस भरपूर पडल्यामुळे नदी नाले ओसंडून वाहिले विहिरींच्या पाणी पातळीतही वाढ झाली आहे जमिनीतही ओलावा निर्माण झाला आहे कालपासून मात्र पावसाने उघडीप दिली आहे त्यामुळे मशागतीच्या कामांनाही वेग आला आहे दरवर्षी सिंचनाची सुविधा असलेले शेतकरी मे महिन्याच्या वीस तारखेपासून हळद लागवडीला सुरुवात करतात त्यामुळे यावर्षीही शेतकऱ्यांनी हळद लागवडीला सुरुवात केली आहे यावर्षी इतर पिकांच्या तुलनेत हळदीला चांगला बाजार भाव मिळाल्यामुळे तसेच हळद हे पीक इतर पिकाच्या तुलनेत हमखास उत्पन्न देणारे पीक असल्यामुळे सिंचनाची सुविधा असलेले शेतकरी दरवर्षी दोन ते चार एकर वर हळदीची लागवड करतात मागील दोन वर्षापासून सोयाबीनचे पडलेले बाजार भाव खर्च करूनही अपेक्षित उत्पन्ना मिळत नसल्यामुळे यावर्षी शेतकऱ्यांनी हळद या पिकाला पसंती दिली आहे परिणामी हळदीच्या लागवडीमध्ये मागील वर्षीपेक्षा दुप्पट वाढ झाली असून यावर्षी तालुक्यात पाच हजार हेक्टर पेक्षाही हळदीचा पेरा जास्त होणार असल्याची माहिती कृषी विभागाकडून प्राप्त झाली आहे मान्सूनपूर्व पडलेल्या पावसामुळे जमिनीत ओलावा निर्माण झाल्यामुळे हळद उत्पादक शेतकऱ्यांने हळद लागवडीला सुरुवात केली आहे यावर्षी दरवर्षीपेक्षा दहा ते बारा दिवस आधी मान्सून दाखल झाला आहे हवामान विभागाने नुकताच अंदाज जाहीर केला असून मान्सून दाखल झाला असला तरी सक्रिय नसल्याचे सांगितले आहे पुढील जून महिन्यामध्ये दहा तारखेपर्यंत उघडीप असल्याचे सांगितले आहे तरीही शेतकरी या हवामान विभागाच्या आंदाजाकडे दुर्लक्ष करीत आहेत.

# दुचाकीची दुभाजकाला धडक लागून एक ठार एक गंभीर जखमी

## सुकळी (ज.) उड्डाणपूलाजवळील घटना

**दैनिक आपला विदर्भ**

उमरखेड/प्रतिनिधीः लग्नासाठी हदगाव येथे दुचाकीवर जात असताना सुकळी (ज . ) उड्डाण पुलाजवळ दुभाजकाला धडक लागून एक ठार तर एक गंभीररित्या जखमी झाल्याची घटना आज सकाळी ११ : ३० वाजताचे सुमारास घडली आहे .विलास पुंडलिकराव इंगळे वय अंदाजे ४८ वर्षे रा. महागाव असे मृतकाचे नाव असून त्याचे सोबत असलेला मनोज परसराम कदम ३६ वर्षे राहणार महागाव असे जखमीचे नाव आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ,महागाव येथून हदगाव येथे दुचाकी क्रमांक एम एच २९ बी जे ९५ ८७ हे दोघे लग्नासाठी जात असताना सुकळी (ज . ) उड्डाण पुलाजवळील दुचाकीची दुभाजकाला धडक लागल्याने विलास पुंडलिकराव इंगळे हा डोक्याला गंभीर मार लागल्याने जागीच ठार झाला . तर मनोज कदम यांच्या पायाला गंभीर मार लागल्याने तो जखमी झाल्याचे असे प्रत्यक्षदर्शीनी पोलिसांना सांगितले .घटनेची माहिती मिळतात पोलिसांनी घटनास्थळ गाठून शवाविच्छेदनासाठी उमरखेड रुणालयात प्रेत हलविले .मृतक हा माजी आमदार राजेंद्र नजरधने यांचा मेहुणा असल्याचे कळते.

# खळेगावात लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची पुण्यतिथी साजरी

**दैनिक आपला विदर्भ**

■ देवानंद सानप

**बिबी :** लोकनेता प्रतिष्ठाण खळेगाव च्या वतीने स्व.मुंडे साहेबाच्या पुण्यतिथी चा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला पुण्यतिथी निमित्त आरतीचा मान बबनराव वेंडोले यांना देण्यात आला होता.प्रमुख पाहुणे श्री.बबनराव वेंडोले यांचा शाल,टोपी,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला तसेच अन्वरखा पठाण यांचेही स्वागत करण्यात आले या कार्यक्रमाप्रसंगी गावातील सर्व जातीधर्माचे नागरिक हजर होते लोकनेता प्रतिष्ठाण च्या सदस्यांनी मोठ्या मेहनतीने हा कार्यक्रम यशस्वी केला



# शिवसेना आमदार सिद्धार्थ खरात यांच्या इशाऱ्यानंतर पालखी मार्गाच्या दुरुस्तीचे काम सुरु

## निकृष्ट दर्जाच्या कामाविरोधात कारवाई अद्याप रखडलेली

**दैनिक आपला विदर्भ**





**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिलेल्या ठाम इशाऱ्यानंतर अखेर पालखी मार्गाच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. रस्ते विकास महामंडळाने तात्काळ दखल घेत कामास सुरुवात केली असून, भेगा बुजवण्याचे व सुधारणा करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

शेगाव येथून दरवर्षी निघणारी संत गजानन महाराजांची पालखी पंढरपूरहून परतताना सिंदखेडराजा, किनगाव जट्टू, लोणार, सुलतानपूर, मेहकर, जानेफळ मार्गे जाते. मात्र या ६४ किलोमीटरच्या पालखी मार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. रस्त्यावर मोठमोठ्या भेगा पडल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे वारकरी व स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती.

या मार्गाचे मूळ काम रस्ते विकास महामंडळाच्या अंतर्गत २०१७ साली श्रीहरी कन्स्ट्रक्शन या कंपनीला देण्यात आले होते. मात्र कंपनीने काम अर्धवट सोडले. नंतर दुसऱ्या ठेकेदाराकडे काम सोपवले गेले, पण त्यांनीही अतिशय निकृष्ट दर्जाचे काम केले. परिणामी रस्ता काहीच वर्षांत खराब झाला.

आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिनांक १५ मे रोजी मार्गाची पाहणी केली. रस्त्यावरील भेगा पाहून त्यांनी तीव्र संताप व्यक्त करत रस्ते विकास महामंडळाला २ जूनपर्यंत काम सुरू न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा दिला. या इशाऱ्याची तात्काळ दखल घेण्यात आली आणि रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले.

तरीही, ज्या कंत्राटदाराने हे काम निकृष्ट प्रकारे पूर्ण केले, त्याच्याविरुद्ध अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, हे विशेष लक्षवेधी ठरत आहे. स्थानिक नागरिकांची मागणी आहे की, दोषी कंत्राटदारावर कठोर कारवाई होऊन भविष्यातील अशा हलगर्जीपणाला आळा घातला जावा.

## विविध वृत्त...

# जिल्ह्यात पेरणीपूर्व तयारी अंतिम टप्प्यात, ७ लाख ४० हेक्टर क्षेत्रावर होणार पेरणी





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पेरणीपूर्व मशागतीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. सध्या शेतकरी बी-बियाणे, खंताची खरेदी करीत असल्याचे चित्र आहे. जिल्हा कृषी विभागाच्या अंदाजानुसार यंदा जिल्ह्यात ७लाख ४० हजार हेक्टरवर पेरणी होणार आहे. हवामान विभागाने १० जूननंतर पावसाची शक्यता व्यक्त केली असून, पेरणी योग्य पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी, असे आवाहन देखील कृषी विभागाने केले आहे. तर मे महिन्यात झालेल्या पावसामुळे मशागतीस गती मिळाली असून, बहुतांश शेतकऱ्यांनी शेतीची तयारी पूर्ण केली आहे. बियाणे, खते सह शेती अवजारे साठवून ठेवली आहेत. आता केवळ वेळेवर पावसाची प्रतीक्षा सुरू आहे. काही भागात वखरणी करुन शेती पेरणीसाठी सज्ज करण्यावर भर दिला आहे.



# आरोग्य उपकेंद्र नियमित सुरु करा अन्यथा उपोषण करुन अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासू



**दैनिक आपला विदर्भ**

■ अशोक मुंढे

**महारचिकना :** सविस्तर वृत्त असे कि, लोणार तालुक्यातील मौजे चोरपांग्रा, गोवर्धन नगर येथे जवळपास पंचवीस ते तीस वर्षापासून उपकेंद्र अस्तित्वात आहे. मात्र या आरोग्य उपकेंद्राकडे कोणताही वरिष्ठ अधिकारी फिरकत नाही. त्यामुळे आरोग्य अधिकारी, कर्मचारी या उपकेंद्राकडे कानाडोळा करतात. व आठवड्यातून एकदाच उपकेंद्र उघडण्यात येते.या संदर्भात स्थानिक नागरिक शिलवंत इंगळे यांनी तालुखा वैद्यकिय अधिकारी व आरोग्य अधिकारी यांना वेळोवेळी तोंडी माहिती देऊन कळवले मात्र या निगरगठ्ठ अधिकाऱ्यावर काहीच असर झाला नाही. आता पावसाळ्याचे दिवस सुरु होणार असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न उद्धवल्यास त्यांना बीबी येथे न्यावे लागते परिणामी त्यांना आर्थिक भुर्दंड बसतो बीबी ते चोरपांग्रा तीन ते चार किलोमीटर अंतर असल्याने रुग्ण दगवण्याची शक्यता नाकारतायेत नाही त्यामुळे चोरपांग्रा येथील शिलवंत इंगळे यांनी लोणार तालुका आरोग्य अधिकारी यांना दि.३ जुन २०२५ रोजी निवेदन देऊन मागण्या मान्य न केल्यास १५ जुन २०२५ पासून तालुखा आरोग्य अधिकारी किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या दालनसमोर आमरण उपोषण करून अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासू असा इशारा शिलवंत इंगळे यांनी दिला आहे

# पाणी टंचाई निवारणार्थ बुलढाणा तालुक्यातील बोरखेड गावासाठी टँकर मंजूर

**बुलढाणा/प्रतिनिधी :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता बुलढाणा तालुक्यातील बोरखेड गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांनी दिली. बोरखेड येथे ३१० पशुधन व १ हजार ८०३ लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे ५१ हजार ३०० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.